# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::

Date 14/06/2025


: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)


# जबरी चोरी करणारा आरोपी अवघ्या २४ तासात रामनगर गुन्हे शोध पथकाचे ताब्यात

## चोरलेली रोख रक्कम ५०,०००/- रुपये हस्तगत

## रामनगर पोलीस स्टेशनची कारवाई

यातील फिर्यादी नामे मधुराम तुलसींग कोल्हा वय ३४ वर्ष रा. कोडाखुरी ता. द्रककोंड जि.कांकेर छत्तीसगड हे दिनांक १३ जुन, २०२५ रोजी रात्री ८:०० वाजता सपना टॉकीज जवळ जलनगर वार्ड चंद्रपूर येथे पाणी बॉटल घेण्यास गेला असता एक अज्ञात इसमाने त्याचे मागे येवुन त्याचे तोंडाला दाबुन त्याचे खिशातून ५०,०००/- रु. नगदी जबरीने हिसकावून नेला. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोस्टे ला अप.क्र.४७०/२०२५ कलम ३०९ (६) भारतीय न्याय संहिता अन्वये जबरीचोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला होता.

सदर गुन्हयाची माहिती मिळताच पो.स्टे.रामनगर येथील गुन्हे शोध पथकाने घटनास्थळ गाठुन गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालाचा व अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी गुप्त बातमीदार व तांत्रिक दृष्टया तपास करुन मिळालेल्या माहितीवरुन आरोपी शेख जुबेर शेख कादर वय ३३ वर्ष रा.रहमतनगर चंद्रपूर यास अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेली रक्कम ५०,०००/- रु. रोख जप्त करण्यात आले असुन सदर आरोपी अवघ्या २४ तासाचे आत पकडण्यात यश आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आसीफराजा शेख यांचे नेतृत्वात गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सपोनि देवाजी नरोटे, सपोनि हनुमान उगले, सपोनि निलेश वाघमारे, पोहवा पेतरस सिडाम, शरद कुडे, सचिन गुरनुले, आंनद खरात, प्रशांत शेंद्रे, लालु यादव, जितेंद्र आकारे, मपोहवा मनिषा मोरे, पोअं. संदीप कामडी, पंकज ठोंबरे, सुरेश कोरवार, मपोअं ब्युल्टी साखरे सर्व पो.स्टे. रामनगर यांनी केली आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::

Date 14/06/2025



: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)


## घरफोडी करणारा आरोपी अवघ्या १२ तासात अटक

## चोरलेले चोन्याचे दागीने किं.१,३५,०००/- रु. चे हस्तगत

## भद्रावती पोलीस स्टेशनची कारवाई

यातील फिर्यादी नामे अजय विजय माडोत वय ३० वर्ष रा. तांडा, भद्रावती हे परिवारासह बाहेरगांवी गेले असता दि.१२/०६/२०२५ चे रात्रौ दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयांनी त्याचे घराचे मुख्य दरवाज्याचे कडी तोडुन घरातील लोखंडी कपाटातील लॉकर मधील सोन्याचे दागीने व रोख रक्कम असा एकुण १,३६,०००/- रु. माल चोरुन नेला बाबत दिलेल्या तक्रारीवरुन पोस्टे ला अप. क्र.२६६/२०२५ कलम ३३१ (३) (४), ३०५ (अ) भारतीय न्याय संहिता अन्वये घरफोडीचा गुन्हा नोंदविण्यात आला होता.

सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालाचा व अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी गुप्त बातमीदार व तांत्रिक दृष्टया तपास करुन मिळालेल्या माहितीवरुन आरोपी नामे सोनु रामदास धारावत वय ४० वर्ष रा.बरांज मोकासा तांडा भद्रावती यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरलेले सोन्याचे दागीने किंमत १,३५,०००/-रुपयाचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु, सहा.पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नयोमी साटम यादव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक लता वाडीवे यांचे नेतृत्वात गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोउपनि गजानन तुपकर, सफौ महेंद्र बेसरकर, पोहवा अनुप आस्टुनकर, जगदीश झाडे, विश्वनाथ चुदरी, पोअं खुशाल कावळे, योगेश घाटोळे सर्व पो.स्टे. भद्रावती यांनी केली आहे.